ePaper
राज्याच्या लालपरीची झोळी रिकामीच, बजेटमध्ये शिळ्या कढीला ऊत, युनियन नेत्याची टीका

| वर्ष - 8 | अंक - 234 | UDYAM-MH-26-0158827 |


महाईन्यूज ™

मंगळवार, दिनांक 11 मार्च 2025

पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- मुंबईचा गुजरातवर दणदणीत विजय!
- रोहित विजयानंतर मायदेशी परतला
- रान्या राव कोर्टात ढसाढसा रडली
- सरकारची कोणतीही भूमिका नव्हती


## विकास आता लांबणार नाही...

# महाराष्ट्र आता थांबणार नाही..

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सादर केला फडणवीस सरकारचा 2025-26 चा अर्थसंकल्प

| मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2047 पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्या संकल्पपूर्तीला बळ देणारा वर्ष 2025-26 चा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तसेच वित्त आणि नियोजनमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला. 'महाराष्ट्र आता थांबणार नाही.., विकास आता लांबणार नाही...' असे सांगत शेती, शेतीपुरक क्षेत्रं, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास अशा अनेक क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला, 'विकसित भारत-विकसित महाराष्ट्र'चे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून देशांतर्गत, विदेशी गुंतवणूक, रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील. विधानसभा निवडणुकीत राज्यातील मतदारांनी व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवण्यात अर्थसंकल्प यशस्वी होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचा 11 वा अर्थसंकल्प विधानसभेत सादर करताना व्यक्त केला.**



उपमुख्यमंत्री तसेच वित्त व नियोजमंत्री अजित पवार यांनी वर्ष 2025-26 चा अर्थसंकल्प आज विधानसभेत सादर केला. अर्थसंकल्पीय भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज, स्वराज्यजननी जिजाऊ माँसाहेब, छत्रपती राजर्षि शाहू महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या महामानवांचे स्मरण केले. शिखांचे नववे गुरु, श्री गुरु तेगबहादूर यांच्या हौतात्म्याचे हे 350 वे वर्ष आहे. स्वराज्य सौदामिनी महाराणी ताराबाई यांचे हे त्रिशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंतीवर्ष आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जन्मवर्ष आहे. देशातील लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या आपल्या संविधानाला 75 वर्षे पूर्ण झाली आहेत. याचाही कृतज्ञतापूर्वक उल्लेख त्यांनी केला. राज्यात गुंतवणुकीला पोषक वातावरण असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, औद्योगिक विकासात राज्य सदैव अग्रेसर असून थेट विदेशी गुंतवणूकीच्या बाबतीतही देशात अव्वल आहे. जानेवारी, 2025 मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्य शासनाव्दारे एकूण 63 कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. त्याद्वारे येत्या काळात 15 लाख 72 हजार 654 कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यातून सुमारे 16 लाख रोजगार निर्मिती होईल, असा अंदाज आहे. वस्तू व सेवा कर कायदा लागू होण्यापूर्वी राज्यकर विभागातर्फे राबविण्यात आलेल्या कायद्यांनुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे असलेली थकबाकीची तडजोड करण्याबाबतची अभय योजना उपमुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात जाहीर केली.

### सर्वांसाठी घरे!

*महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर पहिल्यांदाच अर्थसंकल्पीय अधिवेश होत आहे. या नव्या सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पात नागरिकांना काय मिळणार? हे जाणून घेण्यासाठी सर्वजण आतुर होते. राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडून अर्थसंकल्पीय वाचन सुरु आहे. सगळ्याच घटकांना या अर्थसंकल्पाकडून भरपूर अपेक्षा आहेत. त्यामुळे नव्या घरांसाठी काय तरतूद केली जाणार हे अर्थसंकल्पात मांडण्यात आले आहे."सर्वांसाठी घरे" हे उद्दीष्ट येत्या पाच वर्षात साध्य करण्यासाठी राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.*

### महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याची घोषणा

*छावा चित्रपटामुळे छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास सर्वसामान्यांपर्यंत आला. त्याचे पडसाद जनतेमध्ये उमटत आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर हे ठिकाण छत्रपती संभाजी यांनी केलेल्या अतुलनीय शौर्यामुळे ओळखले जावू लागले. औरंगजेबाच्या सैनिकांनी राजे संभाजी महाराज यांना संगमेश्वर येथील एका देवळात पकडले होते. त्या संगमेश्वरमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांचे भव्य स्मारक उभारण्याची घोषणा अजित पवार यांनी केली. सोमवारी सादर केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणात त्यांनी ही घोषणा केली.*

संबंधित वृत्त पान 7 वर

## स्वदेशी बनावटीची किफायतशीर वैद्यकीय उपकरणे

# भारत जगाला मार्ग दाखविणार!

## आंतरराष्ट्रीय मधुमेह परिषदेत डॉ.व्ही मोहन यांचा दावा

। पुणे ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**भारतामध्ये आपण स्वदेशी बनावटीची किफायतशीर वैद्यकीय उपकरणे, औषधे आणि उपचार पद्धती विकसित करून ती जगाला देऊ शकतो. मधुमेह चिकित्सेमध्ये जगाला मार्ग दाखवण्याचे सामर्थ्य भारतामध्ये आहे, असा दावा मद्रास डायबेटिस रिसर्च फाऊंडेशनचे अध्यक्ष अध्यक्ष डॉ. व्ही. मोहन यांनी केले.**



चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्यूटच्या वतीने पुण्यात नवव्या आंतरराष्ट्रीय मधुमेह परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी स्वीडनमधील कॅरोलिन्स्का इन्स्टिट्यूटचे डॉ.सी.व्ही.संजीवी, यूके नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर हेल्थ रिसर्चचे (एनआयएचआर) चे संचालक डॉ.कमलेश खुंटी, चेलाराम फाऊंडेशनचे उपाध्यक्ष डॉ.प्रकाश भूपटकर, चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्यूटचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.उन्नीकृष्णन ए.जी.आणि मुख्य वैद्यकीय अधिक्षक विंग कमांडर (निवृत्त) डॉ. हर्षल मोरे आणि वैद्यकीय सेवा विभागाच्या प्रमुख डॉ.वेदवती पुरंदरे आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. व्ही. मोहन यांना मधुमेह क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी बोलताना डॉ. व्ही. मोहन म्हणाले की, सध्याचा काळ हा भारतासाठी महत्त्वाचा आहे.

भारतातील औषध निर्माण क्षेत्र हे गुणवत्तेच्या बाबतीत जगात आघाडीवर आहे. आपल्या गरजांप्रमाणे आपण स्वदेशी बनावटीची किफायतशीर वैद्यकीय उपकरणे आणि उपचार पद्धती विकसित करू शकतो. मधुमेह चिकित्सेमध्ये जगाला मार्ग दाखविण्याचे सामर्थ्य भारतीय वैद्यकीय क्षेत्रात आहे. डॉ.सी.व्ही.संजीवी म्हणाले की, भारतात मधुमेहींची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. याशिवाय मधुमेहाच्या पूर्व टप्प्यातील संख्याही लक्षणीय आहे. त्यामुळे हे कमी करण्यासाठी जोखमीच्या घटकांचा विचार करून संपूर्ण आरोग्य या संकल्पनेवर जास्त लक्ष केंद्रित करायला हवे. आपल्याकडे एवढा मोठा माहितीसाठा असताना आपण आपल्या देशातील मधुमेह चिकित्सेचे वेगळे प्रारूप विकसित करू शकतो. मधुमेह आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या मधुमेहाच्या धोक्याचा व गुंतागुंतींचा सामना करण्यासाठी योग्य उपाययोजना जाणून घेण्याच्या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत मधुमेहाच्या गुंतागुंतींचे व्यवस्थापन, किफायतशीर दरात मधुमेह उपचार, नवीन संशोधन आणि मधुमेह व्यवस्थापनातील तंत्रज्ञानाची भूमिका या विषयांवर चर्चा करण्यात आली. या परिषदेमध्ये मधुमेहाचा सामना करण्यासाठी गरोदरपणातील मधुमेह आणि प्रॅक्टिकल इन्शुलिन या विषयावर कार्यशाळा घेण्यात आल्या.

### समाजामध्ये बेरोजगारी वाढली

या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी स्वीडनमधील कॅरोलिन्स्का इन्स्टिट्यूटचे डॉ.सी.व्ही.संजीवी, यूके नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर हेल्थ रिसर्चचे (एनआयएचआर) चे संचालक डॉ.कमलेश खुंटी, चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्यूटचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. उन्नीकृष्णन ए.जी.आणि मुख्य वैद्यकीय अधिक्षक विंग कमांडर (निवृत्त) डॉ. हर्षल मोरे आणि वैद्यकीय सेवा विभागाच्या प्रमुख डॉ.वेदवती पुरंदरे आदी उपस्थित होते.

---

# गौरव आहुजाची येरवड्यात धिंड!

## पोलिसांकडून महागडी मोटार जप्त, पोलीस कोठडीत वाढ

। पुणे । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**भर चौकात लघुशंका करणारा गौरव आहुजाची महागडी मोटार पोलिसांनी जप्त केली. आहुजाच्या मोटारीवर असलेले वाहन क्रमाकांची पाटी काढून टाकल्याचे निदर्शनास आले आहे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एन. एस. बारी यांनी आहुजाला मंगळवारपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. गौरवबरोबर असलेला मित्र भाग्येश ओसवाल याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलिसांनी गौरव आणि त्याचा मित्र भाग्येश याची येरवडा परिसरातून धिंड काढली.**



आहुजा (वय २५, रा. एनआयबीएम रस्ता, कोंढवा) व त्याचा मित्र भाग्येश प्रकाश ओसवाल (वय २२, रा. मार्केट यार्ड) यांच्याविरुद्ध सार्वजनिक ठिकाणी अश्लील वर्तन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. भाग्येश याला शनिवारी रात्री अटक करण्यात आली. त्यानंतर पसार झालेल्या गौरवला रविवारी सकाळी अटक करण्यात आली. न्यायालयाने दोघांना सोमवारपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले होते.

पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर दोघांना सोमवारी न्यायालयात हजर करण्यात आले. भर चौकात अश्लील वर्तन करुन पसार झालेला गौरव याने त्याची मोटार कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले येथील आंबपफाटा येथील पेट्रोल पंपाजवळ लावली होती. भाडेतत्त्वावर मोटार घेऊन तो कर्नाटकात पसार होण्याच्या तयारीत होता. पोलीस मागावर असल्याचे कळताच तो पुन्हा माघारी फिरला आणि सातारा जिल्ह्यातील कराड पोलीस ठाण्यात हजर झाला. गौरवला अटक केल्यानंतर तपासासाठी त्याला हातकंणगले परिसरात नेण्यात आले. तेथून त्याची अलिशान मोटार जप्त करण्यात आली आहे, असे पोलिसांनी न्यायालायत सांगितले. याप्रकरणाचा तपास करायचा असल्याने गौरवला सात दिवस पोलीस कोठडी ठेवण्याची विनंती सरकारी वकील योगेश कदम यांनी केली. न्यायालयाने गौरवच्या पोलीस कोठडीत एक दिवस वाढ केली. त्याचा मित्र भाग्येश याला न्यायालायीन कोठडी मंजूर करण्यात आली. गौरव आहुजा आणि त्याचा मित्र भाग्येश ओसवाल यांची पोलिसांनी येरवडा परिसरात धिंड काढली. गंभीर गुन्हे करणाऱ्या आरोपींना जरब बसविण्यासाठी त्यांची धिंड काढण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत.गौरव आहुजा याची महागडी मोटार पोलिसांनी जप्त केली आहे. वाहन क्रमांकाची पाटी कोणी काढली, याबाबत विचारणा केली असता गौरवने उडवाउडवीची उत्तरे दिल्याचे पोलिसांनी न्यायालयात सांगितले.

### उडवाउडवीची उत्तरे

भर चौकात लघुशंका करणारा गौरव आहुजाची महागडी मोटार पोलिसांनी जप्त केली. आहुजाच्या मोटारीवर असलेले वाहन क्रमाकांची पाटी काढून टाकल्याचे निदर्शनास आले आहे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एन. एस. बारी यांनी आहुजाला मंगळवारपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. गौरवबरोबर असलेला मित्र भाग्येश ओसवाल याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली.

## इलेक्ट्रिक वेहिकल ऑटो एक्जीबिशन 2025

# कष्टकरी महिला सन्मानाने भारावल्या!

### पिंपरी-चिंचवड शहरातील 100 ऑटो रिक्षा चालक महिलांचा सन्मान




। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड येथील ऑटो क्लस्टर येथे आंतरराष्ट्रीय इलेक्ट्रिक वेहिकल ऑटो एक्जीबिशन 2025 मध्ये शहरातील कष्टकरी रिक्षा चालक महिलांचा सन्मान करण्यात आला. या सन्मानाने कष्टकरी महिला अक्षरशः भारावून गेल्या.**

जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने चिंचवड येथील ऑटो क्लस्टर येथे आंतरराष्ट्रीय इलेक्ट्रिक वेहिकल ऑटो एक्जीबिशन 2025 सुरू करण्यात आले आहे. यानिमित्ताने पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून महिलांनी सुरुवातीला पिंक रिक्षा रॅली आयोजित केली. पिंपरी ते ऑटो क्लस्टर पर्यंत हि पिंक रिक्षा रॅली काढण्यात आली.

या कार्यक्रमासाठी जगभरातील प्रतिनिधी उपस्थित होते. जिम बँनसोन, जर्मनी येथुन तसेच अमेरिका, इंग्लंड दुबई जपान, व्हिएतनाम यासह, दिल्ली राजस्थान, पंजाब, गुजरात, चेन्नई हैदराबादसह देशभरातील व प्रदेशातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ऑटो रिक्षा, टॅक्सी, ट्रॅक, टेम्पो, ट्रान्सपोर्ट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष बाबा कांबळे, इंटरनॅशनल फेडरेशन असोसिएशन ऑफ इलेक्ट्रिक वेहिकल के चेअरमन डॉ.एस.के.सरोज, अध्यक्ष डॉ.राजीव मिश्रा, डॉ दीपक वाधवा, श्रीनिवास कुमार, एमएसएमइचे केंद्र सरकार लघुउद्योग विभागाचे के.के.गोयल, डॉ कल्याण हट्टी, आदी उपस्थित होते. इंटरनॅशनल फेडरेशन असोसिएशन ऑफ इलेक्ट्रिक वेहिकल के चेअरमन डॉ. एस. के. सरोज म्हणाले की, ऑटोचा इलेक्ट्रिक वेहिकल मध्ये परिवर्तित होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी महिलांच्या पुढाकाराने पुढे कार्य सुरू ठेवणार आहे. केंद्र शासनाने महिलांना इलेक्ट्रिक व्हेहिकलसाठी अनुदान द्यावे असे आवाहन यावेळी करण्यात आले.

**पिंक रिक्षा उपक्रमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण**

महिलांचे सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरण होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी पिंक रिक्षा योजनेमध्ये एक हजार महिलांच्या सहभागासाठी प्रयत्न करणार असल्याचा निर्धार पिंपरी चिंचवड महापालिका फेरीवाला समिती सदस्य व पिंक रिक्षा संघटनेच्या अध्यक्ष आशा बाबा कांबळे यांनी व्यक्त केला.

**महाराष्ट्रभर पिंक रिक्षा उपक्रम**

आशा कांबळे म्हणाल्या की, पिंपरी चिंचवड आणि पुणे शहरातील काबाडकष्ट करणाऱ्या तसेच अत्यंत दुर्बल घटकातील 100 महिलांना रिक्षा चालवण्याचे प्रशिक्षण देऊन त्यांचा परवाना काढून त्यांना शंभर रिक्षा देण्याचा उपक्रम घरकाम महिला सभा आणि बाबा सामाजिक फाउंडेशन या संयुक्त संस्थेच्या वतीने करण्यात आला होता. याला चार वर्षांपेक्षा अधिक काळ होत आहे. कोविड काळामुळे ही योजना मध्यंतरी बंद होती. परंतु आता नव्याने पुन्हा ही योजना सुरू करून पिंपरी चिंचवड पुणे शहरातील एक हजार महिलांना पिंक रिक्षा योजनेमध्ये सहभागी करून त्यांना पिंक रिक्षा योजनेमध्ये स्वावलंबित करणार असल्याचे आशा कांबळे म्हणाल्या. ही योजना टप्प्याटप्प्याने महाराष्ट्र भरून नंतर देशभर वाढवणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

---

## ‘स्मार्ट सिटीत’ सार्वजनिक स्वच्छतेचा ‘बोजवारा’

### जनसंवाद सभेत तक्रारी : स्वच्छतागृहांची निगा राखा, कचऱ्याचे नियोजन करा!



। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।


**सार्वजनिक स्वच्छतागृहांची निगा राखणे, कचऱ्याचे सुयोग्य नियोजन करणे अशा तक्रारी नागरिकांनी सोमवारी जनसंवाद सभेत प्रशासनाकडे मांडल्या. त्यामुळे ‘स्मार्ट सिटी’ म्हणून नावारुपाला येणाऱ्या पिंपरी-चिंचवडमधील सार्वजनिक स्वच्छतेचा बोजवारा उडाला आहे. प्रशासनाने याबाबत गांभीर्याने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांमधून होत आहे.**

महापालिकेच्या वतीने सोमवारी (दि.10) पार पडलेल्या जनसंवाद सभेत एकूण ८० तक्रार वजा सूचना प्राप्त झाल्या. नागरिक आणि प्रशासन यांच्यात सुसंवाद राखण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार सर्व क्षेत्रीय कार्यालयांत महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. त्यानुषंगाने अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या आठ क्षेत्रीय कार्यालयात आज जनसंवाद सभा पार पडली. यावेळी जनसंवाद सभेचे अध्यक्षपद नेमून दिलेल्या समन्वय अधिकारी यांनी भूषविले.

**...अशा आहेत तक्रारी**

आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयात अनुक्रमे १४, १२, ५, ११, ५, ७, १३ आणि १३ अशा एकूण ८० तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या. यावेळी नागरिकांनी सार्वजनिक स्वच्छतागृहांची निगा राखणे, कचऱ्याचे सुयोग्य नियोजन करणे, रस्त्यावरील विजेचे खांब दुरुस्त करणे, रस्त्याचे डांबरीकरण करणे, ड्रेनेजलाईन दुरुस्त करणे, नवीन ड्रेनेजलाईन टाकणे, फुटलेल्या जलवाहिन्या दुरुस्त करणे, नियमित पाणीपुरवठा करणे, यासारख्या विविध तक्रार वजा सूचना जनसंवाद सभेत मांडल्या.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### प्रपंचात स्त्रीने कसे वागावे ?

पतिसेवा हाच आपला धर्म । प्रपंचाचे कर्तव्य हेच आपले सत्कर्म। अंतरी समाधान हेच आपले साधन ॥ सर्वांनी राहावे सुखी । रामनाम नित्य घ्यावे मुखी ॥ सर्व सुखाचा लाभ । घरबसल्या मिळतो देव ॥

कर्तव्यी असावे तत्पर । मुखी नाम निरंतर ॥ देहाने करावी सेवा । याहून दुजा लाभाचा नाही ठेवा ॥ परमात्म्याने जे जे दिले । ते ते त्याचे म्हणून सांभाळणे भले ॥ त्या लोभात न गुंतवावे चित्त । हाच परमार्थ सत्य॥

नसावे कशाचे ज्ञान । वाटावे सदा घ्यावे रामनाम । प्रपंची राहावे समाधान । हेच भक्ताचे मुख्य लक्षण जाण ॥ पतिव्रता साध्वी थोर थोर। त्यांचे करावे स्मरण । जे करील पुण्यवान ॥ न बोलावी पतीस दुरुत्तरे । समाधान राखोनि अंतरे। जे सज्जनांस आवडेल खरे ॥

पतीपरते न मानावे दुजे दैवत । घरात राखावे नेहमी समाधान ॥ तुमच्या पतिसार'यांची संगति । हीच भाग्याची खरी प्राप्ति ॥ त्यांच्या आज्ञेने वागावे । त्यांच्या सुखात आपले सुख पाहावे ॥ राम धरिता चित्ती । प्रपंचाची काळजी त्याचे हाती ॥

प्रपंची असावे खबरदार ॥ परी लोभात न गुंतावे अंतर । धन संग्रही राखावे । सर्वच खर्चून न टाकावे । ही प्रपंचाची रीत । सर्व जगात आहे चालत ॥ जगाची रीत लोभात असणे । हे मात्र आपणास न आवडावे ॥

देहाने करावी पतिसेवा । ध्यानी धरावा रामराया । त्याचा संसार उत्तम झाला। हाच आशीर्वाद माझा भला॥ प्रपंचाची संगति । काळजीची उत्पत्ति । तेथे धरिता नामाची संगति । काळजीविरहित आनंद देई॥

मुलीच्या लग्नाची काळजी करू नये । प्रयत्नाला सोडू नये। प्रयत्नाअंती परमेश्वर । हे सज्जनांचे बोल । मनी ठसवावे खोल ॥ आरंभी ज्याने स्मरला राम । त्यालाच प्रयत्नाअंती राम । हा ठेवावा विश्वास । सुखे साधावे संसारास॥ मिष्ट भाषण वरिवरी। विष आहे अंतरी । असल्याची संगत नसावी बरी ॥ मी तुम्हास सांगतो हित । दृश्यांत न ठेवावे चित्त । राम सेवेकरता प्राण । म्हणून करणे आहे जतन । मान अपमान जगतात । ते मूळ कारण झाले घातास॥ कोणतेही काम करीत असता । राखावी मनाची शांतता। अगदी व्यवहारबुद्धीने कामे करावी सर्वथा॥

आप्तइष्ट सखेसज्जन । यांचे राखावे समाधान । परी न व्हावे त्यांचे अधीन॥ सर्वांशी राहावे प्रेमाने । चित्त दुश्चित्त न व्हावे कशाने ॥ आल्या अतिथा अन्न द्यावे। कोणास विन्मुख न पाठवावे॥ अगदी व्यवहाराच्या मार्गाने जावे । त्यात रामाचे अधिष्ठान राखावे ॥

बोधवचन:- रामावर ठेवावा विश्वास। सुखाने करावा संसार॥



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**कोणत्याही स्पर्धेत भारताचा संघ अपराजित असतो, तेव्हा अंतिम सामन्यात हमखासपणे हरायचे ही आपली जुनी खोड! प्रेशर म्हणा, टेंपरामेंट म्हणा पण 'लोचा' हा ठरलेलाच ! अंतिम सामन्यासाठी जल्लोषाची तयारी करा, पण पदरी निराशाही ठरलेलीच! थोडक्यात काय भारताची ती खासियतच!**

# जिंकणार तर होतोच, उगीच टेन्शन दिलं राव!



### थोडसं इतिहासात डोकवा..

हे उगीच नाही म्हणत..2003 किंवा 2023 चे वर्ल्डकप आणि इतर अनेक फायनल्स बघा.. त्यात यावेळेस समोर न्यूझीलंड ! स्टार खेळाडूंचा भरणा नसलेला पण, मोक्याच्या वेळेस प्रत्येक जण आपला खेळ उंचावणारा असा पक्का व्यावसायिक संघ आहे न्यूझीलंडचा ! आयसीसी टूर्नामेंटमधले त्यांचे आपल्याविरुद्धचे रेकॉर्ड पण जबरदस्तच ! त्यामुळेच रविवारच्या 'चॅम्पियन ट्रॉफी' च्या फायनलमध्ये प्रचंड धाकधूक मनात ! त्यात प्रसारमाध्यमे ताप वाढवायचं काम इमाने, इतबारे करीत होतीच..यावेळी रिस्क नको म्हणून कित्येक 'श्रद्धाळूं'नी अतिशय लो प्रोफाईल ठेवत घरीच मॅच पाहणे पसंत केले, हे पण महत्त्वाचे !

### रोहित शर्मा आणि नाणेफेक..

रोहित शर्मा आणि नाणेफेक यांचे नाते म्हणजे पाकिस्तान आणि शांतता एवढे सरळ आहे. रोहित शर्मा आणि त्याच्या नशीबाच डील झालं असावं..'तुला मॅच जिंकून देतो पण नाणेफेक नाही'..ओळीनं पंधरा टॉस हरणे ही काय सोपी गोष्ट आहे ! गमतीने आता प्रेक्षकही बोलू लागले आहेत.. ते शोले मधलं नाणं तर नाही ना ?

### सगळं कसं ठरल्याप्रमाणं !

अपेक्षेप्रमाणेच न्यूझीलंडने फलंदाजी घेतली.. अंतिम सामन्याचे प्रेशर, दुसऱ्या डावात ऐन वेळी फिरण्याची खेळपट्टीची सवय आणि दंव पडण्याचा मुद्दा तिथे नसल्याने तो निर्णय स्वाभाविक होता. रचिन रवींद्रची क्षमता आणि सध्याचा त्याचा फॉर्म बघता तो सामना कधीपण फिरवू शकतो. पण, कुलदीपनं त्याचा आणि सदाबहार केन विल्यमसनचा अडथळा दूर केला, आणि मोठ्या धावसंख्येपर्यंत पोहचण्याची स्वप्ने धुळीस मिळवली.

### पाहिजे तशी खेळपट्टी..

खरं तर आजची खेळपट्टी आधीच्या सामन्यांच्या तुलनेत थोडी सोपी होती. फिरक पण कमी मिळत होती. पण, अक्षर, जडेजा, कुलदीप आणि भन्नाट वरूण यांनी 'विकेट टू विकेट' टिच्चून गोलंदाजी केली, धावा रोखल्या आणि न्यूझीलंडला वेळोवेळी धोके घ्यायला भाग पाडले. भारतीय फिरकीने टप्प्याटप्प्याने विकेट घेत रनरेट कमी ठेवला.

मिशेल आणि भारतीय गोलंदाजी यांच काय आपसी प्रेम आहे माहीत नाही, पण गडी खेळतोच! धोकादायक फिलिप्स शुभमनने एक दान देऊन पण विशेष काही करू शकला नाही. ती उणीव भरून काढली ब्रेसवेलनं ! शामीच्या शॉर्ट ऑफ लेंथ बोलिंग ला त्याने आस्मान दाखवले. ते पुल शॉट्स बघून रोहित पण खुश झाला असेल, एवढा तो फटका नयनरम्य होता!

### रोहितच्या नेतृत्वाची कमाल..

न्यूझीलंडच्या संपूर्ण डावात रोहितची कॅप्टन्सीची कमाल होती. त्याचे बोलिंग चेंजेस, स्ट्रॅटेजी आणि फिल्ड प्लेसमेंट कमाल होती. कुठेही हाराकिरी नाही, एक दोन फटके बसले म्हणून शाळकरी कॅप्टनसारखे धावत गोलंदाजाकडे जाणे नाही. शांतपणे सगळा कार्यक्रम करणे एवढेच ध्येय! त्याने वरूण चक्रवर्तीला संपूर्ण स्पर्धेत कमालपणे वापरले. तरीही अपेक्षेपेक्षा न्यूझीलंडने वीस एक धावा अधिक केल्या, हे पण लक्षात घ्यायला हवे !

### 'टार्गेट' मोठे नव्हते !

दोनशे बावन्न हे टार्गेट खूप अवघड, मोठे नव्हते. पण, खेळपट्टीचे स्वरूप, न्यूझीलंडची गोलंदाजी ( हेन्रीशिवाय सुद्धा), क्षेत्ररक्षण आणि अंतिम सामन्याचा दबाव पाहता खूप परिपक्व आणि शिस्तबद्ध बॅटिंगची आवश्यकता होती. रोहितची आजची इनिंग त्याचे एक उत्तम उदाहरण होते. सुंदर फिरकी गोलंदाजांप्रमाणे फलंदाजही जबाबदारीने खेळताना दिसले. खरे तर सुरूवातीलाच रोहित शर्माने धोके पत्करून 'पिंच हिटर' बनून तीस चाळीस रन्स काढून जायचे, ही कोणाच्या डोक्यातील सुपीक योजना आहे देव जाणे !आज तो तसा खेळला नाही, हे आपले सुदैव! त्याच्यात गुणवत्ता एवढी भरलीय, की आरामात खेळला तरी शंभरच्या आसपास स्ट्राईक रेट असतोच. प्रत्येक वेळेस विराट 'संकटमोचक' ठरेल ही अपेक्षाच चुकीची ठरली. त्यानेच प्रत्येक वेळी संघाला पराभवाच्या खाईतून वर काढायचे, ते किती दिवस चालायचे!

### फिलिप्सचा अफलातून कॅच..

रोहितमुळे शुभमनला वेळ घेता आला. तो सेट झाल्यानंतर लयीत आला आणि एका अफलातून कॅचने त्याचा डाव संपवला. एरवी, लयबद्ध टाकणाऱ्या सॅंटनरने एक 'फ्लाईटेड स्लोअरवन' टाकला. शुभमननं पूर्ण ताकतीनं बॉल मैदानाबाहेर टाकण्यासाठी 'फूल ब्लडेड ऑफ ड्राईव्ह' मारला आणि पुढं जे झालं ते निव्वळ अविश्वसनीय होतं. पण, एक क्रिकेट रसिक म्हणून डोळ्यांना प्रचंड सुखावह होत! फिलिप्सनं यास्पर्धेत अनेक अफलातून कॅचेस घेतलेत, पण तू कॅश मात्र सर्वोत्तम ठरावा, असाच होता. रिअल टाईममध्ये सेकंदाच्या फ्रॅक्शन मध्ये तो ॲन्टीसिपेट करणे, जम्पिंग टाईम करणे आणि थोडेसे मागे जाऊन तो कॅच पकडणे..वा मजा आली..सर्व गोष्टीच अविश्वसनीय म्हणाव्या लागतील.

### भारताचा सर्वोत्तम संघ..

त्यानंतर आलेल्या विराटनं थोडा अपेक्षाभंगच केला. ब्रेसवेलच्या पहिल्याच बॉलला ॲक्रॉस खेळताना फसला आणि सगळ्या देशाचा श्वास थांबला, नंतर धावांचा ओघ आटला आणि वाढवताना रोहित फसला! त्यानंतर अक्षर पटेल, राहूल, पांड्याआणि शेवटी जडेजा !प्रत्येकाने बाजू सांभाळत नय्या पार केली आणि अजून एका 'चॅम्पियन्स ट्रॉफी' चे अजिंक्यपद पटकावूनच रोहितचा चमू भारतात परतला. भारताचा संपूर्ण संघच यावेळी चांगलाच बहरात आहे. कोणताही बलाढ्य संघ यापुढे टिकू शकत नाही, एवढा मोठा विश्वास रोहितच्या संघाने मिळवला आहे, हे नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुंडे नावाच्या गुंडाला मुख्यमंत्री वाचवत आहेत

## धनंजय मुंडेला वाचवू नका: मनोज जरांगे-पाटील

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**९ डिसेंबरला बीडमधल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. या प्रकरणात पोलिसांनी तातडीने आरोपींना अटक केली. आवादा कंपनीच्या खंडणीच्या गुन्ह्यातून ही महाराष्ट्राची मान खाली जाणारी हत्या करण्यात आली. त्या घटनेचं क्रौर्य काय आहे ते समोर आलेल्या फोटोंवरुन समजलं आहेच. दरम्यान मनोज जरांगेंनी या प्रकरणी भाष्य केलं आहे. धनंजय मुंडेंना मुख्यमंत्री वाचवत आहेत असं मनोज जरांगे म्हणाले आहेत.**



### मुंडेंना मुख्य आरोपी होऊ देत नाहीत

अशी मागणी विरोधकांकडून होत होती. तो राजीनामा ४ मार्चला झाला आहे. दरम्यान मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी धनंजय मुंडे यांच्यावर कलम ३०२ लागू नये म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाला पूर्णविराम दिल्याचा आरोप केला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाणूनबुजून यांनी विषयाला पूर्णविराम दिला आहे. तपास यंत्रणा किंवा पोलिसांना सांगून हे सगळं मिटवण्यात आलं. सीआयडी किंवा एसआयटी यांच्याकडे किंवा स्थानिक पोलिसांकडे धनंजय मुंडे त्या गुन्ह्यात असल्याचे १०० टक्के पुरावे आहेत. परंतु देवेंद्र फडणवीस हे धनंजय मुंडेंना मुख्य आरोपी होऊ देत नाहीत.

संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी जे आरोपी अटक झाले त्यातला कृष्णा आंधळे हा आरोपी फरार आहे. तर वाल्मिक कराडच्या विरोधातही गुन्हा दाखल झाला आहे. तसंच मकोकाही लावण्यात आला आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन मागच्या सोमवारी सुरु झालं. त्याच दिवशी रात्री संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो समोर आले. सोशल मीडियावर ते व्हायरल झाले. ज्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजेच ४ मार्चला धनंजय मुंडे यांना राजीनामा द्यावा लागला. वाल्मिक कराड हा धनंजय मुंडेंचा खास माणूस आहे त्यामुळे या प्रकरणाची नैतिक जबाबदारी धनंजय मुंडेंनी स्वीकारुन राजीनामा दिला पाहिजे अशी मागणी विरोधकांकडून होत होती. तो राजीनामा ४ मार्चला झाला आहे. दरम्यान मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी धनंजय मुंडे यांच्यावर कलम ३०२ लागू नये म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाला पूर्णविराम दिल्याचा आरोप केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाणूनबुजून यांनी विषयाला पूर्णविराम दिला आहे. तपास यंत्रणा किंवा पोलिसांना सांगून हे सगळं मिटवण्यात आलं. सीआयडी किंवा एसआयटी यांच्याकडे किंवा स्थानिक पोलिसांकडे धनंजय मुंडे त्या गुन्ह्यात असल्याचे १०० टक्के पुरावे आहेत. परंतु देवेंद्र फडणवीस हे धनंजय मुंडेंना मुख्य आरोपी होऊ देत नाहीत. ३०२ चं कलम लावत नाहीत. देवेंद्र फडणवीस यांनी धनंजय मुंडेसारख्या गुंडाला वाचवू नये. कारण एक दिवस तो विषारी साप तुमच्यासमोर उभा राहिल. त्यावेळी पश्चात्तापाचा हात कपाळावर मारुन घेणारे देवेंद्र फडणवीस पहिले असतील असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे. खंडणी मागायला जा किंवा खून करा अशीच बैठक झालेली आहे. वाल्मिक कराडच्या कार्यालयातच ही बैठक झाली आहे. आधी कट रचला गेला आहे. खुनाच्या कटाचा आरोपही धनंजय मुंडेंवर लागला पाहिजे. मला हे वाटतं आहे की तपास यंत्रणांकडे पुरावे आहेत. फक्त देवेंद्र फडणवीस यांनी थांबायला सांगितलं आहे. त्यामुळे तपास यंत्रणा हतबल झाल्या आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी जर मनावर घेतलं तर उद्या सकाळी धनंजय मुंडे ३०२ च्या कलमांत तुरुंगात जातील. देवेंद्र फडणवीस यांनी गुंडाला वाचवू नये. कारण तुमच्या पक्षापुढे आणि तुमच्यापुढे धनंजय मुंडे संकट म्हणून उभा असेल, त्यामुळे ही मागणी आहे की धनंजय मुंडेला वाचवू नका. गोर गरीबाची अत्यंत क्रूर हत्या करण्यात आली आहे असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे.संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी जे आरोपी अटक झाले त्यातला कृष्णा आंधळे हा आरोपी फरार आहे. तर वाल्मिक कराडच्या विरोधातही गुन्हा दाखल झाला आहे. तसंच मकोकाही लावण्यात आला आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन मागच्या सोमवारी सुरु झालं. त्याच दिवशी रात्री संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो समोर आले. सोशल मीडियावर ते व्हायरल झाले. ज्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजेच ४ मार्चला धनंजय मुंडे यांना राजीनामा द्यावा लागला. वाल्मिक कराड हा धनंजय मुंडेंचा खास माणूस आहे त्यामुळे या प्रकरणाची नैतिक जबाबदारी धनंजय मुंडेंनी स्वीकारुन राजीनामा दिला पाहिजे.

# आता कळेल हू इज धंगेकर!

## धंगेकरांनी शिवसेनेत प्रवेश करताच एकनाथ शिंदे म्हणाले

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**पुण्यातील कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि काँग्रेस नेते रवींद्र धंगेकर यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षात प्रवेश केला. यावेळी माजी आमदार धंगेकर यांच्यासह त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत प्रवेश केला.**



### पक्ष सोडताना मला दु:ख

दरम्यान आज सकाळी माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी पत्रकार परिषद घेऊन काँग्रेस सोडणार असल्याची माहिती दिली होती. ते म्हणाले, “मी गेल्या १०-१२ वर्षांपासून या पक्षाबरोबर काम करत आहे. पक्षातील सहकारी हे कुटुंबातील सदस्य बनले आहेत. सर्वांनी माझ्यावर प्रचंड प्रेम केलं.

२०२३ मध्ये कसबा विधानसभेच्या पोटनिवडणुकीत रवींद्र धंगेकर यांनी भाजपाच्या बालेकिल्ल्यात सध्याचे आमदार हेमंत रासने यांचा पराभव केला होता. त्यानंतर त्यांची राज्यभरात चर्चा झाली होती. मात्र, गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत धंगेकर यांना पराभव स्वीकारावा लागला होता. त्यानंतर त्यांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. आज धंगेकर यांच्या पक्षप्रवेशावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, “आता लोकांना कळेल हू इज धंगेकर?” अशी मिश्किल टिप्पणी केली. शिंदे यांच्या या टिप्पणीनंतर उपस्थितांमध्ये हशा पिकला.यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, “रवींद्र धंगेकर हे पुण्यातील लोकप्रिय लोकनेते म्हणून ओळखले जातात. त्यांनी त्यांची ओळख कामाने निर्माण केली आहे. यांच्या पोटनिवडणुकीवेळी मी तिकडे होतो. ती निवडणूक गाजली पण, सगळी फौज लागली तरी धंगेकरांनी बाजी मारली आणि लोकसेवक काय असतो हे दाखवले. त्यामुळे लोकांना कळेल हू इज धंगेकर?”दरम्यान आज सकाळी माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी पत्रकार परिषद घेऊन काँग्रेस सोडणार असल्याची माहिती दिली होती. ते म्हणाले, “मी गेल्या १०-१२ वर्षांपासून या पक्षाबरोबर काम करत आहे. पक्षातील सहकारी हे कुटुंबातील सदस्य बनले आहेत. सर्वांनी माझ्यावर प्रचंड प्रेम केलं. मी लोकसभा निवडणूक लढवली, विधानसभा निवडणूक लढवली, त्यावेळी पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी माझ्यामागे मोठी ताकद उभी केली. त्यांच्या जोरावरच मी त्या निवडणुका लढवू शकलो. मी निवडणुकीत पराभूत झालो ती वेगळी गोष्ट आहे. मात्र पक्षातील लोकांनी माझ्यासाठी कष्ट केले. सर्वांनी माझ्याबरोबर ताकद उभी केली होती. त्यामुळेच आता पक्ष सोडताना मला दुःख होत आहे.”दरम्यान रवींद्र धंगेकर यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात शिवसेपासून केली होती. १९९७ ते २००२ मध्ये त्यांच्या भगिनी वंदना धंगेकर आणि त्यानंतर २००२ ते २०२२ पर्यंत रवींद्र धंगेकर हे विविध पक्षांच्या तिकिटावर पुणे महानगरपालिकेमध्ये सलग चार वेळा नगरसेवक म्हणून निवडून गेले होते.

# सरकारची कोणतीही भूमिका नव्हती!

## गुलमर्गमध्ये फॅशन शो: काश्मीरच्या विधानसभेत पडसाद



।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जम्मू काश्मीर येथील गुलमर्ग येथे आयोजित करण्यात आलेला एका फॅशन शो सध्या चांगलाच चर्चेत आला आहे. या फॅशन शोचे पडसाद राज्याच्या विधानसभेत देखील उमटल्याचे पाहायला मिळाले. यादरम्यान काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनाशी सरकारचा कसलाही संबंध नसल्याचे म्हटले आहे.**

काश्मीर येथील मुख्य धर्मगुरू मिरवाईज उमर फारूक यांनी रविवारी रमजान सुरू असताना आयोजित केलेला हा फॅशन शो अपमानजनक आणि अश्लील असल्याची टीका केली होती. यानंतर मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यावर उत्तर देताना म्हणाले की, “मी पाहिलेल्या फोटोंमधे दिसून येते की यामध्ये संवेदनशिलतेकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे आणि तेही या पवित्र महिन्यात (रमजान).”शिवन अँड नरेश या डिझायनर लेबलच्या १५व्या वर्धापन दिनाच्या निमित्तानेशुक्रवारी गुलबर्ग येथे या फॅशन शोचे आयोजन करण्यात आले होते. या फॅशन शोचे फोटो समोर आल्यानंर राज्यात वाद पेटला असून सरकारवर टीका केली जात आहे. मिरवाईज यांनी या फॅशन शोबद्दल संताप व्यक्त केला होता. ते म्हणाले होते की, “काश्मीर येथे पर्यटनाला प्रोत्साहन देण्याच्या नावाखाली अशा पद्धतीची अश्लीलता खपवून घेतली जाणार नाही.” तर पीपल्स कान्फरन्सचे अध्यक्ष साजद लोन यांनी याला सहज टाळता येण्यासारखा कार्यक्रम म्हटले आहे. श्रीनगरचे खासदार आगा रुहुल्लाह मेहदी आणि काँग्रेस नेत्या दीपिका पुष्कर नाथ यांनीही या कार्यक्रमाच्या आयोजनावर टीका केली होती. सोमवारी अर्थसंकल्पावरील चर्चेपूर्वी विधिमंडळात बोलताना ओमर अब्दुल्ला यांनी सांगितलं की, प्राथमिक तपासात आढळून आले आहे की गुलमर्ग येथे एका प्रायव्हेट पार्टीने आयोजित केलेला चार दिवसांचा कार्यक्रम होता. अब्दुल्ला हे सोमवारी आमदारांनी विधिमंडळात उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देत होते.’या कार्यक्रमामुळे लोकांच्या भावना दुखवल्या गेल्याच्या मुद्द्यावर बोलताना ते म्हणाले की, “काही लोक म्हणाले की हे रमजानच्या पवित्र महिन्यात हे व्हायला नको होते, पण मला वाटते की मी तिथे जे पाहिले ते रमजान सोडा, वर्षातील इतरही कोणत्या महिन्यात होता कामा नये.” “मला एक गोष्ट स्पष्ट करायची आहे की सरकारची यामध्ये कसलीही भूमिका नाही. ती एक प्रायव्हेट पार्टी होती. त्यांनी कार्यक्रम खाजगी पद्धतीने खाजगी हॉटेलमध्ये आयोजित केला होता आणि त्यांनी खाजगी पद्धतीनेच त्याच्या निमंत्रण पत्रिका वाटल्या होत्या,” असेही अब्दुल्ला यांनी स्पष्ट केले.या कार्यक्रमासाठी सरकारकडून कसलीही परवानगी घेण्यात आली नव्हती, तसेच सरकारी कोणत्याच सुविधा त्यांनी वापरल्या नाहीत, सरकारी यंत्रणा त्या ठिकाणी उपस्थित नव्हती असेही त्यांनी स्पष्ट केले. प्रशासनाला चौकशी करण्याचे तसेच आवश्यकता असल्यास प्रकरण पोलिसांकडे सोपवण्याच्या सूचना देण्यात आल्याचेही अब्दुल्ला यांनी सांगितले.काश्मीर येथील मुख्य धर्मगुरू मिरवाईज उमर फारूक यांनी रविवारी रमजान सुरू असताना आयोजित केलेला हा फॅशन शो अपमानजनक आणि अश्लील असल्याची टीका केली होती. ‘यानंतर मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यावर उत्तर देताना म्हणाले की, “मी पाहिलेल्या फोटोंमधे दिसून येते की यामध्ये संवेदनशिलतेकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे आणि तेही या पवित्र महिन्यात (रमजान).”शिवन अँड नरेश या डिझायनर लेबलच्या १५व्या वर्धापन दिनाच्या निमित्तानेशुक्रवारी गुलबर्ग येथे या फॅशन शोचे आयोजन करण्यात आले होते. या फॅशन शोचे फोटो समोर आल्यानंर राज्यात वाद पेटला असून सरकारवर टीका केली जात आहे. मिरवाईज यांनी या फॅशन शोबद्दल संताप व्यक्त केला होता. ते म्हणाले होते की, “काश्मीर येथे पर्यटनाला प्रोत्साहन देण्याच्या नावाखाली अशा पद्धतीची अश्लीलता खपवून घेतली जाणार नाही.” तर पीपल्स कान्फरन्सचे अध्यक्ष साजद लोन यांनी याला सहज टाळता येण्यासारखा कार्यक्रम म्हटले आहे.

### कार्यक्रमाच्या आयोजनावर टीका

श्रीनगरचे खासदार आगा रुहुल्लाह मेहदी आणि काँग्रेस नेत्या दीपिका पुष्कर नाथ यांनीही या कार्यक्रमाच्या आयोजनावर टीका केली होती. गुलमर्ग येथे एका प्रायव्हेट पार्टीने आयोजित केलेला चार दिवसांचा कार्यक्रम होता. अब्दुल्ला हे सोमवारी आमदारांनी विधिमंडळात उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देत होते.

# रान्या राव कोर्टात ढसाढसा रडली

## अधिकाऱ्यांवर केले आरोप, “शिव्या दिल्या, म्हणाली माझा छळ झाला



।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**दुबईतून बंगळुरुमध्ये परतत असलेल्या अभिनेत्रीला मागच्याच आठवड्यात अटक करण्यात आली. ही अभिनेत्री दुसरी तिसरी कुणी नसून दाक्षिणात्य अभिनेत्री रान्या राव आहे. तिने आज न्यायालयात अधिकाऱ्यांवर विविध आरोप केले आहेत.**

कन्नड चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री रान्या रावला बंगळुरुच्या कॅम्पेगौडा विमानतळावर मागच्या आठवड्यात अटक करण्यात आली. तिच्याकडून १४.८ किलो सोनं जप्त करण्यात आलं आहे. या सोन्याची किंमत जवळपास १२ कोटी रुपयांहून अधिक आहे. रान्या रावने मागच्या वर्षभरात गल्फ देशांमधल्या १० तरी फेऱ्या केल्या आहेत. तसंच ५ मार्चच्या आधीच्या १५ दिवसांत ती चार वेळा दुबईला जाऊन आली. त्यामुळे ती तपास यंत्रणांच्या रडारवर आली. त्यानंतर तिच्यावर नजर ठेवण्यात आली. रान्या मंगळवारी जेव्हा दुबईहून बंगळुरुला पोहचली तेव्हा तिला पोलिसांनी आणि तपास यंत्रणांनी थांबवलं. तिच्या झडतीत पोलिसांना सगळं घबाड सापडलं. एवढंच नाही तर जतीन हुक्केरी हा रान्याचा पती आहे. तो प्रतिथयश आर्किटेक्ट आहे. त्याचं किंवा त्याच्याशी संबंधित कुणाचंही काम दुबईत सुरु नाही अशीही माहिती पोलिसांना मिळाली ज्यामुळे रान्या दुबईत तस्करीसाठी जात असावी असा संशय पोलिसांना आला. ज्यानंतर तिची झडती घेण्यात आली. त्यात तिच्याकडे १२ कोटींहून अधिक रकमेचं सोनं मिळालं.

या प्रकरणी रान्या रावला अटक झाली. न्यायालयात गेल्यावर तिने रडायलाच सुरुवात केली.रान्या रावला कोर्टात आणल्यानंतर तिने जोरजोरात रडायला सुरुवात केली. डायरेक्टरेट ऑफ रेव्हेन्यू इंटेलिजन्स म्हणजेच DRI च्या अधिकाऱ्यांनी मला शिवीगाळ केली आणि माझा मानसिक छळ केला असा आरोप तिने कोर्टात केला आहे. न्यायालयाने आज तिचं म्हणणं ऐकून घेतलं. त्यानंतर DRI ने हे सांगितलं की असं काहीही घडलेलं नाही. रान्या राव तपासात कुठल्याही प्रकारे सहकार्य करत नाही.

### त्या अधिकाऱ्यांनी शिवीगाळ केली

तस्करीच्या या प्रकरणात रान्या रावला न्यायालयाने २४ मार्चपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.मला अधिकाऱ्यांकडून धमक्या दिल्या जातात. मी उत्तर दिलं नाही तर मला म्हणतात, तुला माहीत आहे ना तू जर जर बोलली नाहीस तर काय होईल?२) मला मारहाण झालेली नाही. पण मला त्या अधिकाऱ्यांनी शिवीगाळ केली.



# अनेक क्षेत्रांसाठी भरीव तरतूद!

## अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प केला सादर

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

महाराष्ट्रातील पर्यटन वाढत आहे. "पर्यटन धोरण-२०२४" जाहीर करण्यात आले आहे. येत्या १० वर्षात पर्यटन क्षेत्रात १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आल्याची माहिती अर्थमंत्री अजित पवार यांनी दिली. राज्याचे आरोग्य पर्यटन धोरणही आखण्यात येत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. राज्यामध्ये येत्या काळात १५ लाख ७२ हजार ६५४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून त्यामाध्यमातून १६ लाख रोजगार निर्मिती होणार आहे अशी अजित पवारांनी घोषणा केली. राज्याचा २०२५-२६ या वर्षासाठी अर्थमंत्री अजित पवारांनी आज अर्थसंकल्प सादर केला. अजित पवारांनी अर्थमंत्री म्हणून त्यांचा ११ वा अर्थसंकल्प सादर केला असून त्यामध्ये राज्यासाठी अनेक महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत. त्यामध्ये आग्र्यामध्ये शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक बांधण्यात येणार असल्याचं जाहीर करण्यात आलं. तसेच छत्रपती संभाजी महाराजांचे संगमेश्वर या ठिकाणी भव्य स्मारक उभारण्यात येणार आहे. राज्यात परदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासचक्राला चालना देण्यासाठी खासगी तसेच शासकीय गुंतवणूक, नागरिकांचा उपभोग खर्च आणि निर्यात या चार प्रमुख घटकांमध्ये वृद्धी होणे आवश्यक आहे असं अजित पवारांनी यावेळी म्हटलं. दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्य शासनाव्दारे एकूण ६३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले.

## अर्थसंकल्पातील मोठ्या घोषणा

१ मुघलांच्या नजरकैदेतून आग्र्याहून सुटका हा शिवचरित्रातील प्रेरणादायी प्रसंग आहे. छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेत होते, तेथे भव्य स्मारक उभारण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे. त्यासाठी उत्तर प्रदेश शासनाच्या सहकार्याने जागा उपलब्ध करुन घेण्यात येईल.

२ छत्रपती शिवरायांनी स्थापन केलेल्या स्वराज्याच्या रक्षण आणि विस्तारासाठी जीवन समर्पित केलेल्या, असीम शौर्य आणि धैर्याने लढलेल्या, सर्व लढायांत विजयश्री मिळविणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाच्या खुणा महाराष्ट्रात जिथे आहेत, त्यात कोकणातील संगमेश्वर हे एक प्रमुख ठिकाण आहे. औरंगजेबाच्या महाकाय सेनेशी महाराजांनी बोटावर मोजता येतील एवढ्या शूर मावळ्यांना सोबत घेऊन येथेच पराक्रमाची शर्थ केली. स्वराज्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या स्वाभिमानी राजाच्या पराक्रमाची स्मृती कायमस्वरुपी जपण्यासाठी संगमेश्वर येथे त्यांचे भव्य स्मारक उभारण्यात येणार आहे.

३ छत्रपती संभाजी महाराजांचे पवित्र बलिदानस्थळ असलेल्या मौजे तुळापूर आणि समाधीस्थळ मौजे वढु बुद्रुक येथे त्यांच्या भव्य स्मारकाचे काम प्रगतीपथावर आहे. "छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणा गीत" पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णयही शासनाने नुकताच घेतला आहे.

४ स्वराज्यासाठी बलिदान देणाऱ्या लाखो मराठ्यांच्या शौर्याचे प्रतिक म्हणून हरियाणातील पानिपत येथे यथायोग्य स्मारक उभारण्याचा निर्णयही आम्ही घेतला आहे. हरियाणा शासनाच्या मदतीने या स्मारकासाठी जागा उपलब्ध करुन घेण्यात येईल.

५ निर्यातीमध्ये भरीव वाढ होण्याकरीता राज्याने "महाराष्ट्र राज्य निर्यात प्रोत्साहन धोरण-२०२३" जाहीर केले असून राज्यात ३७ विशेष आर्थिक क्षेत्रे, ८ कृषि निर्यात क्षेत्रे, निर्यातकेंद्रित २७ औद्योगिक पार्क उभारण्यात आले आहेत. त्यामुळे, देशाच्या एकूण निर्यातीत राज्याचे योगदान १५.४ टक्के झाले आहे. याशिवाय "एक जिल्हा-एक उत्पादन", जिल्ह्यांना निर्यातकेंद्र म्हणून विकसित करणे, राज्य-जिल्हा निर्यात प्रोत्साहन परिषद असे काही महत्वाचे उपक्रम राज्यात राबविण्यात येत आहेत. सन २०२३-२४ मध्ये एकूण ५ लाख ५६ हजार ३७९ कोटी रुपयांची व सन २०२४-२५ मध्ये नोव्हेंबर, २०२४ पर्यंत ३ लाख ५८ हजार ४३९ कोटी रुपयांची उत्पादने निर्यात करण्यात आली.

६ राज्याचे "लॉजिस्टिक धोरण-२०२४" जाहीर करण्यात आले असून त्याद्वारे १० हजार एकराहून अधिक क्षेत्रावर समर्पित लॉजिस्टिक पायाभूत सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. प्रकल्पांना देऊ केलेल्या विशेष प्रोत्साहन व सुविधांमुळे सुमारे ५ लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होणार आहे.

७ मुंबई महानगर प्रदेश हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक विकास केंद्र, म्हणजेच "ग्रोथ हब" म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वांद्रे-कुर्ला संकुल, कुर्ला-वरळी, वडाळा, गोरेगाव, नवी मुंबई, खारघर व विरार - बोईसर या सात ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यापार केंद्रे निर्माण केली जाणार आहेत.

८ नवीन पिढीला रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच नव-उपक्रमांमध्ये राज्य अग्रेसर व्हावे, यासाठी नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर, इनोव्हेशन सिटी, उभारण्यात येणार आहे.




- प्रधानमंत्री ग्रामसडक योजना टप्पा -३ अंतर्गत ६ हजार ५०० किलोमीटर लांबीची, ५ हजार ६७० कोटी रुपये किंमतीची कामे मंजूर असून त्यापैकी ३ हजार ७८५ किलोमीटर लांबीची कामे पूर्ण झाली आहेत.सन २०२५-२६ साठी १५०० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.
- मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ ची कामे पूर्णत्वास आली असून टप्पा-२ अंतर्गत ९ हजार ६१० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या दर्जोन्नतीची कामे मार्च, २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे
- मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ अंतर्गत अतिरिक्त ७ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे.
- मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-३ अंतर्गत १ हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ३ हजार ५८२ गावे, १४ हजार किलोमीटर लांबीच्या सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याने प्रमुख जिल्हा मार्गाना, राज्य महामार्ग किंवा राष्ट्रीय महामार्गांना जोडली जातील
- या प्रकल्पाची एकूण किंमत ३० हजार १०० कोटी रूपये आहे. पहिल्या टप्प्यात ८ हजार कोटी रूपये रकमेची कामे हाती घेण्यात येणार आहेत.
- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले असून त्यासाठी ६४ हजार ७५५ कोटी रुपये खर्च झाला आहे.
- इगतपुरी ते आमणे हा ७६ किलोमीटर लांबीचा टप्पा लवकरच वाहतुकीसाठी खुला होईल.
- या महामार्गालगत ॲग्रो-लॉजिस्टिक हब विकसित केले जाणार असून त्यात कोल्ड स्टोरेज, ग्रेडिंग, पॅकिंग व निर्यात हाताळणी केंद्रांच्या प्रमुख सुविधा पुरविण्यात येतील. याचा लाभ प्रामुख्याने विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना होईल.
- मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील खोपोली ते खंडाळा या घाट लांबीतील मिसिंग लिंक प्रकल्पाचे काम ऑगस्ट, २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.
- मुंबई उपनगर परिसरातील वाहतूक गतिमान व्हावी यासाठी वर्सोवा ते मढ खाडीपूल, वर्सोवा ते भाईंदर किनारी मार्ग, मुलुंड ते गोरेगाव, ठाणे ते बोरिवली आणि ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्ग असे ६४ हजार ७८३ कोटी रुपये किंमतीचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.
- स्वातंत्र्यवीर सावरकर सागरी सेतूचे वांद्रे ते वर्सोवा या दरम्यानचे १४ किलोमीटर लांबीचे, १८ हजार १२० कोटी रुपये खर्चाचे काम मे, २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

# मुंबईचा गुजरातवर दणदणीत विजय!

## 9 धावांनी केली मात; फुलमालीची वादळी खेळी व्यर्थ

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुंबई इंडियन्सने रोमांचक सामन्यात गुजरात टायटन्सचा ९ धावांनी दणदणीत पराभव करत विजय मिळवला. मुंबईच्या संपूर्ण संघाने विजयामध्ये मोलाची भूमिका बजावली. हरमनप्रीत कौरने शानदार अर्धशतक झळकावले तर अमेलिया करने ३ विकेट्स घेतले. हॅली मॅथ्यूजने अखेरच्या षटकात १२ धावांचा बचाव करत उत्कृष्ट गोलंदाजी केली आणि विकेटही घेतली.**



मुंबई इंडियन्स वि. गुजरात टायटन्स यांच्यात एक रोमहर्षक सामना खेळवला गेला. भारती फुलमालीने गुजरातकडून २५ चेंडूत ४ षटकार आणि ८ षटकारांसह ६१ धावांची वादळी खेळी केली. मुंबईने गुजरातला विजयसाठी १८० धावांचे लक्ष्य दिले होते. पण प्रत्युत्तरात गुजरातच्या संघाने एकामागोमाग एक सर्व मोठे विकेट्स गमावले. पण भारतीय खेळाडू भारती फुलमालीने वादळी खेळी करत मुंबईला विजयासाठी मोठे मेहनत करायला लावली.

सिमरन शेखनेही भारतीला चांगली साथ दिली.गुजरातने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण मुंबईने कर्णधार हरमनप्रीत कौरच्या अर्धशतकाच्या जोरावर १७९ धावा केल्या. मुंबईकडून नवी सलामी जोडी हिली मॅथ्यूज आणि अमेलिया कर लवकर बाद झाले. कर ५ धावा करत हिली २५ धावा करत बाद झाली. तर फॉर्मात असलेल्या नॅट स्किव्हर ब्रंट आणि हरमनप्रीत कौरने यांनी अर्धशतकी भागीदारी केली. नॅट ६ चौकारांसह ३८ धावा करत हरमनप्रीत ३३ चेंडूत ९ चौकारांसह ५४ धावा करत बाद झाली. यानंतर अमनजोत कौरने २७ धावांची उत्कृष्ट खेळी केली. तर सजना सजीवनने २२ आणि यस्तिका भाटियाने १३ धावांची शानदार खेळी केली आणि संघाला १७९ धावांपर्यंत नेले.मुंबईने दिलेल्या १८० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातने ४१ धावांवर ३ विकेट गमावले. हरलीन देओल २४ धावा, फिबी लिचफिल्ड २२ धावा आणि भारती फुलमालीने ६१ धावा केल्या. याशिवाय कोणताच फलंदाज २० धावांचा आकडा गाठू शकला नाही.

मुंबईकडून हिली मॅथ्यूज आणि अमलिया कर यांनी ३-३ विकेट्स तर शबनम इस्माईल २ व संस्कृतीच्या नावे १ विकेट आहे.वुमन्स प्रीमियर लीग २०२५ चे अखेरचे दोन सामने खेळवले जात आहेत. मुंबई इंडियन्सच्या घरच्या मैदानावर म्हणजेच ब्रेबॉर्न क्रिकेट स्टेडियमवर मुंबई अखेरचे दोन सामने खेळत आहे. मुंबईचा पुढचा सामना उद्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरूद्ध होणार आहे.

### जोरावर 179 धावा केल्या

मुंबई इंडियन्स वि. गुजरात टायटन्स यांच्यात एक रोमहर्षक सामना खेळवला गेला. भारती फुलमालीने गुजरातकडून २५ चेंडूत ४ षटकार आणि ८ षटकारांसह ६१ धावांची वादळी खेळी केली. मुंबईने गुजरातला विजयसाठी १८० धावांचे लक्ष्य दिले होते. पण प्रत्युत्तरात गुजरातच्या संघाने एकामागोमाग एक सर्व मोठे विकेट्स गमावले. पण भारतीय खेळाडू भारती फुलमालीने वादळी खेळी करत मुंबईला विजयासाठी मोठे मेहनत करायला लावली. सिमरन शेखनेही भारतीला चांगली साथ दिली.गुजरातने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण मुंबईने कर्णधार हरमनप्रीत कौरच्या अर्धशतकाच्या जोरावर १७९ धावा केल्या. मुंबईकडून नवी सलामी जोडी हिली मॅथ्यूज आणि अमेलिया कर लवकर बाद झाले. कर ५ धावा करत हिली २५ धावा करत बाद झाली. तर फॉर्मात असलेल्या नॅट स्किव्हर ब्रंट आणि हरमनप्रीत कौरने यांनी अर्धशतकी भागीदारी केली.

# रोहित चॅम्पियन्स ट्रॉफी विजयानंतर मायदेशी परतला

## रोहित शर्मा मुंबईत दाखल झाल्याचा व्हीडिओ व्हायरल

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाचा कर्णधार चॅम्पियन्स ट्रॉफी विजयानंतर मायदेशी परतला आहे. दुबईत झालेल्या फायनलमध्ये टीम इंडियाच्या विजयाचा हिरो ठरलेला कर्णधार रोहित सोमवारी संध्याकाळी मुंबईत आपल्या घरी परतला. यावेळी रोहितच्या स्वागतासाठी चाहत्यांची मोठी गर्दी विमानतळावर होती आणि रोहितने त्यांच्या प्रेमाबद्दल हात दाखवत सर्वांचे आभारही मानले. यावेळी रोहित शर्मा त्याच्या कुटुंबाबरोबर एकटाच माघारी परतलेलं पाहायला मिळालं आहे. ज्याचा व्हीडिओ आता व्हायरल होत आहे.**



रविवारी, ९ मार्चला चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम सामन्यात भारताने रोहितच्या नेतृत्वाखाली न्यूझीलंडवर शानदार विजय मिळवला. भारताने किवी संघाचा ४ गडी राखून पराभव केला आणि १२ वर्षांनंतर पुन्हा चॅम्पियन्स ट्रॉफीवर कब्जा केला. फायनलमध्ये ७६ धावा करून संघाला चॅम्पियन बनवण्यात कर्णधार रोहितने सर्वात मोठी भूमिका बजावली. भारताच्या या ऐतिहासिक विजयाच्या एका दिवसानंतर, सोमवारी १० मार्चला संध्याकाळी रोहित त्याच्या कुटुंबासह मुंबईला परतला. नेहमीप्रमाणेच यावेळीही रोहित त्याची मुलगी समायराला उचलून घेत एअरपोर्टवरून बाहेर पडताना दिसला. रोहित शर्मासाठी एअरपोर्टवर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त पाहायला मिळाला. तर चाहत्यांनी रोहित शर्माची एक झलक पाहण्यासाठी तुफान गर्दी केली होती. रोहितच्या स्वागतासाठी विमानतळावर चाहत्यांची मोठी गर्दी झाली होती आणि सर्वांनी भारतीय कर्णधाराच्या नावाने घोषणाबाजी करत त्याचे जोरदार स्वागत केले. रोहितला घेण्यासाठी त्याची रेंज रोव्हर कार आधीच विमानतळाबाहेर तयार उभी होती. चाहत्यांकडून झालेले स्वागत, घोषणाबाजी दरम्यान रोहित आपल्या कारमध्ये बसून घराकडे निघाला. आयपीएल फ्रँचायझी मुंबई इंडियन्सनेही रोहितचा एक व्हिडिओ इन्स्टाग्रामवर पोस्ट केला आहे. तर काही वेळाने रोहितची पत्नी रितिका सजदेहदेखील त्यांच्या मुलासह एअरपोर्टबाहेर येताना दिसली. टी-२० विश्वचषक २०२४ प्रमाणे यावेळी भारतीय संघ एकत्र आला नाही.

### 22 मार्चपासून आयपीएल

उलट सर्व खेळाडू वेगवेगळे मायदेशात परतणार आहेत. कारण २९ जून रोजी टी-२० वर्ल्ड चॅम्पियन बनल्यानंतर जशी विजयाची ओपन बस परेड आयोजित केली होती. तशी बीसीसीआयने यावेळी विजय परेडची व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे सर्व खेळाडू वेगवेगळे देशात परतणार आहेत आणि रोहित हा परतणाऱ्या खेळाडूंमध्ये पहिला खेळाडू आहे. या विजयानंतर आता कर्णधार रोहित शर्मासह सर्व खेळाडू पुढील काही दिवस विश्रांती घेतील आणि लवकरच मैदानात परततील. सर्व स्टार खेळाडू आता पुढील २ महिने आयपीएल २०२५ साठी सज्ज असणार आहेत. येत्या २२ मार्चपासून आयपीएलच्या १८व्या सीझनला सुरूवात होणार आहे. पहिलाच सामना कोलकाता नाईट रायडर्स वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात होणार आहे.भारतीय संघाचा कर्णधार चॅम्पियन्स ट्रॉफी विजयानंतर मायदेशी परतला आहे. दुबईत झालेल्या फायनलमध्ये टीम इंडियाच्या विजयाचा हिरो ठरलेला कर्णधार रोहित सोमवारी संध्याकाळी मुंबईत आपल्या घरी परतला. यावेळी रोहितच्या स्वागतासाठी चाहत्यांची मोठी गर्दी विमानतळावर होती आणि रोहितने त्यांच्या प्रेमाबद्दल हात दाखवत सर्वांचे आभारही मानले. यावेळी रोहित शर्मा त्याच्या कुटुंबाबरोबर एकटाच माघारी परतलेलं पाहायला मिळालं आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

। मंगळवार ।

। दि. 11 मार्च 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




## जागतिक महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रम

# स्व-सुरक्षेसाठी महिलांकडे सतर्कता महत्त्वाची!

### जागतिक महिला दिन: पोलीस उपनिरीक्षक दिपाली आवारे यांचे मत

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्र पोलीस प्रशासनाने महिला सुरक्षेबाबत विविध सुविधा सुरू केल्या आहेत. त्यांचा अवलंब केला पाहिजे. महिला सुरक्षा हेल्पलाईन- 1091 आणि नियंत्रण कक्षाकडून मदतीसाठी 112 असा संपर्क क्रमांक आहे. त्याचा अवलंब केला पाहिजे. महिलांनी स्व-सुरक्षेसाठी सतर्कता ठेवली पाहिजे, असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक आणि राष्ट्रीय खेळाडू दिपाली आवारे यांनी केले.**



पुनावळे येथील डी.एस.के. कुंजबन हौसिंग सोसायटीमध्ये जागतिक महिला दिनाच्या निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपनिरीक्षक दिपाली वाघ, स्त्रीरोग तज्ञ डॉ. सैंध्रंत्री काटे- शिंदे उपस्थित होत्या. सरस्वती पूजन करुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. लहान मुलांनी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. पाहुण्यांना 'भगवद्गिता' भेट देवून सन्मान करण्यात आला. "महिला सुरक्षा आणि आरोग्य" या उद्देशाने कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला सोसायटीतील रहिवाश्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. डॉ. काटे-शिंदे यांनी यावेळी महिला आरोग्य आणि प्रसुतीपूर्व-प्रसुतीनंतर घ्यावयाची काळजी, तसेच मुलींच्या आरोग्याबाबत महिलांशी संवाद साधला. महिला आरोग्याच्या दृष्टीने, नियमित आरोग्य तपासणी, संतुलित आहार, पुरेसा व्यायाम, तणाव व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. मासिक पाळी आणि प्रसूती संबंधित समस्यांवर वेळीच लक्ष देणे महत्त्वाचे आहे. वर्षातून एकदा तरी महिलांनी स्त्रीरोग तज्ञांकडून तपासणी करून घेणे आवश्यक आहे, ज्यामुळे गर्भाशयाचे आरोग्य, स्तनाचा कर्करोग आणि इतर महिला संबंधित समस्या लवकर ओळखता येतात. महिलांनी आपल्या आहारात फळे, भाज्या, प्रथिने आणि पुरेसे पाणी यांचा समावेश करणे आवश्यक आहे. तसेच, कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डीचे सेवन करणे हाडांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे. नियमित योगासने, धावणे, चालणे किंवा इतर शारीरिक क्रिया महिलांच्या आरोग्यासाठी खूप फायद्याचे ठरतात, अशा विविध मुद्यांवर डॉ. काटे- शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

---

# शिक्षकांच्या कार्यपद्धती मुळे नवीन पिढी घडते : प्रा. गोविंदराव दाभाडे

### जयश्री घावटे यांच्या सेवपूर्तीनिमित्त निरोप समारंभ

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**"शिक्षक हा आपल्या आचार , विचार आणि कार्यपद्धतीद्वारे समाज घडवण्याचे काम करतो. ध्येयवादी शिक्षकांची पिढी निवृत्तीच्या उंबरठ्यावर असताना त्यांचे कार्य पुढील पिढीने नेटाने पुढे न्यावे. सामाजिक भावनेने शिक्षण देत गरीब मुलांना आधार देत मदत मिळवून देणाऱ्या तसेच इंग्रजी भाषा विषयात संस्थेचा नावलौकिक निर्माण करणाऱ्या जयश्री घावटे यांचा वारसा चालवावा." असे गौरवोद्गार नवनगर शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव प्रा. गोविंदराव दाभाडे यांनी काढले.**




पर्यवेक्षिका जयश्री घावटे यांना बत्तीस वर्षाच्या अखंड सेवेनंतर भावपूर्ण निरोप देण्यात आला. त्या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून प्रा. दाभाडे बोलत होते. सरस्वती पूजन करून ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सौ. घावटे इंग्रजी विषय शिकवत असताना त्या विषयात स्वप्नाली केवळे ही विद्यार्थिनी महाराष्ट्र राज्यात त्या विषयात प्रथम आली होती. गोरगरीब विदयार्थ्यांना आर्थिक मदत मिळवून देणे, इंग्रजी नाटिका बसवणे, पिंपरी चिंचवड इंग्रजी शिक्षक मंच च्या माध्यमातून समन्वय करणे, शालेय आणि शाळाबाह्य उपक्रमांचे आयोजन करणे आदी उपक्रमांच्या मुळे त्या विद्यार्थिप्रिय शिक्षिका होत्या. पुणे, पिंपरी चिंचवड, नाशिक ,लातूर येथील विविध संस्थांचा आदर्श शिक्षिका पुरस्कार त्यांना मिळालेला आहे. जयश्री घावटे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. सरस्वती प्राथमिक - माध्यमिक- उच्चमाध्यमिक विद्यालय, स्वामी विवेकानंद विद्यालय, आदी च्या वतीने सन्मान करण्यात आला. आजी माजी शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता. प्रास्ताविक संगीता भोळे यांनी केले. सूत्रसंचालन सरिता खेनट यांनी केले. आभार प्रदर्शन अर्चना बुधकर यांनी केले.

#### विद्यार्थीनिष्ठ कार्यपद्धती आवश्यक...

विविध वक्त्यांनी सौ जयश्री घावटे यांच्या सहकाऱ्यांशी जुळवून घेत आत्मीयता जोपासत विद्यार्थीनिष्ठ कार्यपद्धतीचा व अध्यापन कौशल्याचा आवर्जून उल्लेख केला. कर्करोगासारख्या दुर्धर आजाराशी धैर्याने सामना करून त्यांना उत्तरायुष्य आरोग्यपूर्ण लाभावे अशा शुभकामना दिल्या. अध्यक्ष स्थानी संस्थापक प्रा. गोविंदराव दाभाडे होते. या प्रसंगी रोटरी क्लबच्या दर्शना कामत, व्याख्याते राजेंद्र घावटे, संगीता गुरव, विजय बच्चे, राजेश माळे, हेमंत अभोनकर, प्रदीप काळोंखे यांची प्रमुख उपस्थिती होती. सविता पाटील, धैर्यशील लावंड, राजेंद्र घावटे मनोगत व्यक्त केले.

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education

EDUCATING **MIND & HEART**

## ADMISSIONS OPEN
**FOR AY 2025-26**

# Holistic Empowering Learning

IT ALL **STARTS HERE**



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **42** | **55+** | **11+** | **17K+** | **600+** | **13K+** |
| YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION | NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS | CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA | 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES | TEACHING AND NON TEACHING STAFF | 13,000 ALUMNI ACROSS GLOBE |

## **PRIYADARSHANI** GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA

+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!